आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

८ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- लोकसभेत वक्फ (दुरुस्ती) विधेयक तसंच भारतीय वायुयान विधेयक सादर
- भारतीय रिझर्व बँकेच्या द्वैमासिक पत धोरणात सर्व व्याजदर तसंच जीडीपी वाढीचा अंदाज कायम
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं न्यूझीलंडमधे स्वागत, महत्त्वाच्या मुद्द्यांवर न्यूझीलंडच्या प्रधानमंत्र्यांशी चर्चा
- रसायनशास्त्रातल्या शांती स्वरूप भटनागर पुरस्कारासाठी महाराष्ट्रातल्या यवतमाळ जिल्ह्यातले डॉ.विवेक पोलशेट्टीवार यांची निवड

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिकमधे भारतीय पुरुष हॉकी संघानं कांस्यपदक पटकावलं

**<><><><><>**

लोकसभेत आज वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी सादर केलं. यात वक्फ कायदा १९९५ मध्ये सुधारणा करुन राज्य वक्फ बोर्डांचे अधिकार आणि कार्यप्रणाली तसंच वक्फ मालमत्तेची नोंदणी आणि सर्वेक्षणाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं या विधेयकाला विरोध केला असून सर्वपक्षीय बैठक बोलावून त्यावर सूचना घेण्याची मागणी केली आहे.

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी आज लोकसभेत भारतीय वायुयान विधेयक २०२४ सादर केलं. हे विधेयक केंद्र सरकारला कोणत्याही विमानासाठी किंवा विमानांच्या श्रेणीसाठी, विमानाच्या ऑपरेशनच्या

सुरक्षिततेसाठी आणि कोणत्याही हवाई अपघाताच्या किंवा घटनेच्या तपासासाठी नियम बनविण्याचे अधिकार देतं.

<><><><><>

उद्यम पोर्टलवर ४ कोटी ८० लाख जणांनी नोंदणी केली आहे असं लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जीतन राम मांझी यांनी सांगितलं. उद्यम पोर्टल, पीएम विश्वकर्मा योजना आणि या क्षेत्रातील विविध उपक्रमांद्वारे २० कोटी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्याचही त्यांनी म्हटलं आहे.

सरकारनं जल जीवन मिशन अंतर्गत देशभरातील ७७ टक्क्यांहून अधिक ग्रामीण कुटुंबांना नळ जोडणी दिली आहे असं पूरक प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी सांगितलं. या योजने अतंर्गत आतापर्यंत १५ कोटी कुटुंबांना नळ जोडणी दिल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

कोविडनंतर सरकार भांडवली खर्चात जास्तीत जास्त वाढ करत असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. राज्यसभेत वित्त विधेयक, विनियोजन विधेयक आणि जम्मू आणि काश्मीर विनियोग विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. २०२३-२४ या आर्थिक प्रभावी भांडवली खर्च १५ लाख कोटीपेक्षा जास्त किंवा १८ टक्के असू शकतो, असं सीतारामन म्हणाल्या.

या विधेयकांवरच्या चर्चेची सुरुवात करताना काँग्रेसचे खासदार विवेक तनखा यांनी महिलांसाठी देशात विशेष कर आकारणीचे विशेष टप्पे नसल्याकडे लक्ष वेधलं. महिलांसाठी स्वतंत्र कार्य संकुलाची मागणीही तनखा यांनी केली. तर हा अर्थसंकल्प

गरीब, ग्रामीण जनता, युवा आणि महिलांसाठी असल्याचं भाजपा खासदार रमिलाबेन बारा म्हणाल्या. आयुर्विमा आणि आरोग्य विम्यावरचा १८ टक्के जीएसटी रद्द करण्याची मागणी तृणमूल काँग्रेसच्या खासदार डोला सेन यांनी केली. द्रमुकच्या कनिमोळी, आपचे संजय सिंह, बिजेडीचे देबाशीष समंतरा यांनीही या चर्चेत सहभाग घेतला.

<><><><>

अणुऊर्जेमध्ये आत्मनिर्भर होण्यासाठी देशानं सातत्यानं प्रयत्न केल्याचं सरकारनं आज राज्यसभेत सांगितलं. भारतानं अणु आणि संबंधित इंधन तंत्रज्ञानात सर्वसमावेशक क्षमता प्राप्त केली असल्याचं राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात सांगितलं.

<><><><>

कांदा आणि बटाट्याच्या दर वाढीवरून विरोधी पक्षांच्या खासदारांनी आज संसद परिसरात निदर्शनं केली. शेतमालाला हमीभाव देण्यासाठी कायदेशीर तरतुदीची मागणी खासदारांनी केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन, राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज कुमार झा, काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

<><><><>

भारतीय रिझर्व बँकेनं आज चालू आर्थिक वर्षातलं तिसरं द्वैमासिक पतधोरण जाहीर करताना सलग नवव्यांदा रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीनं रेपो दर कायम ठेवण्याचा निर्णय

घेतल्यामुळे स्थायी ठेवींवरचा व्याज दर सव्वा सहा टक्के, तसंच मुदत ठेवींवरचा व्याज दर आणि बँकांचा व्याज दर पावणेसात टक्क्यावर कायम राहील, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितलं की आर्थिक विकासाला चालना देताना चलनवाढ निर्धारित उद्दिष्टाशी सुसंगत राहील, यावर लक्ष केंद्रित करण्यावर पतधोरण समितीनं भर दिला आहे.

रिझर्व बँकेनं चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी, अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा अंदाजही ७ पूर्णांक २ दशांश टक्के इतका कायम ठेवला. जीडीपी मधली लवचिक आणि स्थिर वाढ पतधोरणाला चलनवाढीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी सक्षम बनवते असं गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणाले.

कर्जपुरवठा क्षेत्रातल्या अवैध प्रकरणांना आळा घालण्यासाठी डिजिटल कर्ज पुरवठा करणाऱ्या ॲपची सुविधा उपलब्ध करण्याचा रिझर्व्ह बँकेचा विचार असल्याचं गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी घोषित केलं. रिझर्व बँकेनं UPI द्वारे कर भरण्याची मर्यादा देखील १ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये केली आहे.

<><><><><>

देशाचा विकास दर सरासरी ५ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा अंदाज लक्षात घेता, भारत, २०३० च्या दशकाच्या सुरुवातीला उच्च मध्यम-उत्पन्न गटातला, तर २०५० सालापर्यंत उच्च उत्पन्न गटातला देश बनेल असं नीती आयोगाचे सदस्य डॉ. अरविंद वीरमणी यांनी म्हटलं आहे. मुंबईत आयोजित जागतिक व्यापार विषयक परिषदेत डॉ. वीरमणी यांनी आज बीजभाषण दिलं. त्यावेळी ते बोलत होते. ‘व्यत्ययांशी जुळवून घेताना: लवचिकता, शाश्वतता आणि नवोन्मेष’, ही या कार्यक्रमाची संकल्पना होती.

उत्पन्नाची पातळी वाढताना, भारतानं पिण्याचं पाणी, स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थापनासह, शहरी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर भर द्यायला हवा, असं डॉ. वीरमणी यावेळी म्हणाले.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन दिवसांच्या न्यूझीलंडच्या दौऱ्यावर आज सकाळी वेलिंग्टन इथं पोहोचल्या. न्यूझीलंडच्या गव्हर्नर जनरल डेम सिंडी किरो यांच्या उपस्थितीत त्यांचं औपचारिक स्वागत करण्यात आलं. त्यानंतर त्यांनी वेलिंग्टन रेल्वे स्थानका समोरच्या उद्यानातल्या महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

राष्ट्रपती मुर्मू यांनी आज वेलिंग्टनमध्ये न्यूझीलंडचे प्रधानमंत्री क्रिस्टोफर लक्सन आणि इतर नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी भारत आणि न्यूझीलंड दरम्यान सीमाशुल्क सहकार्याबाबतच्या करारावर स्वाक्षरी झाली. त्यानंतर राष्ट्रपती न्यूझीलंडच्या गव्हर्नर जनरल डेम सिंडी किरो यांनी त्यांच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या मेजवानीला उपस्थित राहिल्या.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या यवतमाळ जिल्ह्यातले मुकुटबनचे रहिवासी डॉ.विवेक पोलशेट्टीवार यांची राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांना रसायनशास्त्रातील शांती स्वरूप भटनागर हा पुरस्कार २३ ऑगस्ट रोजी दिल्लीमध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते देण्यात येणार आहे. सध्या ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये कार्यरत आहेत.

केंद्र सरकारनं काल राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रांमध्ये अतुलनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या प्रतिष्ठेच्या पुरस्कारानं सन्मानित केलं जातं.

<><><><><>

आयफोन निर्मिती करणारी ॲपल ही कंपनी भारतातलं उत्पादन दुप्पट करणार आहे. भारतातली आयफोनची विक्री ८ बिलियन डॉलर इतकी झाल्यानं कंपनीनं हा निर्णय घेतला आहे. त्यासाठी फोन संचाची निर्मिती करणारी फॉक्सकॉन कंपनी तामिळनाडूच्या श्रीपरंबदूर इथं आयपॅडचा निर्मिती प्रकल्प सुरू करणार आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टपर्यंत महिलांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली. नाशिकमध्ये दिंडोरी इथं आज दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेचा प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. लाडकी बहीण योजना राजकीय हेतूने प्रेरित नसून महिलांच्या सबलीकरणासाठी आणलेली आहे, असं ते म्हणाले.

कांद्यावरच्या निर्यातीवरचे निर्बंध शिथिल करून ती सुलभ करावी यासाठी केंद्र शासनाला सांगितल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिक मध्ये भारताच्या पुरुष हॉकी संघाने स्पेनला दोन विरुद्ध एक अशा गोलफरकाने हरवून चौथ्यांदा कास्य पदक पटकावलं आहे.  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हॉकी संघाचं अभिनंदन केलं आहे. कुस्तीपटू अमन सहरावत याने ५७ किलो वजनी गटात उपांत्य फेरीत प्रवेश केला असून त्याचा सामना जपानच्या रेई हिग्युची याच्याशी आज रात्री पावणे दहा वाजता होणार आहे.

भालाफेकपटू नीरज चोप्रा आज पदकासाठी मैदानात उतरणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार नीरज चोप्राचा सामना रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी सुरू होईल.

दरम्यान, भारताची वेटलिफ्टर मिराबाई चानु ४९ किलो वजनी गटात चौथ्या स्थानावर राहिली. धावपटू अविनाश साबळे याला पुरुषांच्या ३ हजार मीटर स्टिपलचेज प्रकारात अकराव्या स्थानावर तर महिलांच्या शंभर मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत ज्योती याराजी हिला चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.